# लेखन प्रकाशित करून डॉ. कदम यांच्या स्मृती जपाव्यात

## डॉ. अरुण भोसले; डॉ. व्ही. एस. कदम यांना शोकसभेत आदरांजली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. कदम यांचा इतिहास विभागाच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांनी मराठा इतिहासविषयक केलेले लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित करणे हीच खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शोकसभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. सौ. नंदा पारेकर होत्या.

डॉ. भोसले म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे इतिहास विभागाचे शिल्पकार म्हणून डॉ. कदम यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावले. डॉ. कदम यांचा कालखंड म्हणजे इतिहास विभागाचा सुवर्णकाळ होता.



**कोल्हापूर : डॉ. व्ही. एस. कदम यांना आदरांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत बोलताना डॉ. अरुण भोसले. सोबत डॉ. भारतभूषण माळी, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदा पारेकर, निलांबरी जगताप. (छाया : नाज ट्रेनर)**

त्यांच्या स्मृती जपण्यासाठी प्रयत्न करूया.

डॉ. नंदा पारेकर म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधक असणारे डॉ. कदम हे शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे संस्थापक सदस्य होते. निवृत्त प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या उभारणीत डॉ. कदम यांचे मोलाचे योगदान आहे. शिस्तप्रिय विद्यार्थी घडविणाऱ्या डॉ. कदम यांचे सडेतोड बोलणे होते. त्यांची उणीव भासते. निवृत्त प्राचार्य आय. एच. पठाण म्हणाले, डॉ. कदम यांचा आदरयुक्त दरारा होता. मराठा लढवय्या लढाईवेळी हर हर महादेव का म्हणतात याचे त्यांनी उत्तमरीत्या विश्लेषण केले होते.

प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील म्हणाले, सत्यशोधक चळवळीचे गाढे अभ्यासक असणाऱ्या डॉ. कदम यांनी अनेक विद्यार्थी घडविले. त्यांचाच विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या होत्या. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी लेखन प्रकाशित करण्याबरोबरच एखादी व्याख्यानमाला सुरू करता येईल का, यासाठी प्रयत्न करूया. भारतभूषण माळी म्हणाले, आपल्या तत्त्वांशी तडजोड न करणारा संशोधक अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी दिलेल्या विचारांनी आणि तत्त्वज्ञानाने वाटचाल करून त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली वाहता येईल. सहायक प्रा. डॉ. अवनीश पाटील म्हणाले, आपण एका थोर इतिहासकाराला मुकलो आहोत.

निलांबरी जगताप यांनी डॉ. कदम यांच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. व्ही. एस. कदम यांच्या स्नुषा आणि शिवाजी विद्यापीठाच्या कायदा सल्लागार ॲड. अनुष्का कदम म्हणाल्या, डॉ. कदम यांच्यावर प्रेम करणाऱ्या मंडळींनी निवृत्तीनंतरही त्यांचा सन्मान करून त्यांच्या स्मृती जपल्या आहेत. यावेळी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. धीरज शिंदे, दत्तात्रय मचाले, डॉ. मंजुश्री पवार आदी उपस्थित होते.

■ प्रा. ए. एम. गुरव
विभागप्रमुख, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

# वाणिज्य-व्यवस्थापन क्षेत्रातील करिअर

**वाणिज्य क्षेत्रात करिअर करण्यासाठी कोणत्या पदव्या आवश्यक आहेत हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. विविध पदांवर काम करत असताना विविध प्रकारची शैक्षणिक आर्हता असणे आवश्यक आहे. त्यामुळे कोणता कोर्स केल्यानंतर कुठे संधी मिळू शकते हे पाहणेही महत्त्वाचे ठरते.**

## बी. कॉम.

बी. कॉम. ही पदवी तीन वर्षांची असून अकाउंट, कॉस्टिंग, औद्योगिक व्यवस्थापन, आय. टी., विमा विपणन, इत्यादी विषयामध्ये पदवी घेता येते. विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त महाविद्यालयामधून बी. कॉम होता येते व लेखापाल, अधीक्षक, कर सल्लागार, व्यावसायिक इत्यादी क्षेत्रामध्ये करिअर करता येते.

## बी. बी. ए.

बी. बी. ए. हा तीन वर्षांचा कोर्स असून बारावी झाल्यानंतर कोणत्याही शाखेचा विद्यार्थी बी. बी. ए. साठी प्रवेश घेवू शकतो. या कोर्ससाठी कॉमर्स व्यवस्थापन, कर्मचारी व्यवस्थापन, ह्यूमन स्कील्स, विपणन इत्यादी विषयांचे ज्ञान मिळते. या कोर्ससाठी साधारणपणे रुपये दहा-१५ हजार इतकी फी असून करीअरच्या विविध संधी बी.बी.ए. झाल्यानंतर मिळू शकतात. या कोर्सनंतर एम. बी. ए. करता येते तसेच विविध क्षेत्रमध्ये नोकरी करता येते.

## एम. कॉम.

एम. कॉम. हा दोन वर्षाचा कोर्स असून फी साठी साधारणपणे रुपये पाच हजार ते दहा हजार खर्च येतो. या कोर्समध्ये आठ विषय अभ्यासावे लागत असून चार विषय ठरलेले तर तर चार विषय पर्यायी असतात. अकाउंट, कॉस्टिंग व्यवसाय प्रशासन, विमा, वाहतूक, प्रक्टिस, उद्योजकता, बँकिंग, संख्याशास्त्र, सहकार, इत्यादी १२हून अधिक स्पेशलायझेशनमध्ये एम. कॉम. करता येते. हा कोर्स इंग्रजी माध्यमातून पूर्ण करावा लागतो. काही विद्यापीठांमधून हा कोर्स मराठीमधून शिकता येतो तसेच चांगली नोकरी, व्यवसाय, सल्ला केंद्र इत्यादीमध्ये संधी मिळू शकते.

## एम. बी. ए.

एम. बी. ए. हा दोन वर्षांचा कोर्स असून साधारणपणे २१ विषय अभ्यासावे लागतात तसेच प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करावा लागतो. एम. बी. ए. ला प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे दिला जातो.



हा कोर्स इंग्रजी माध्यमामध्ये उपलब्ध आहे. एम. बी. ए. मध्ये एच. आर., फायनान्स, अॅग्री मार्केटिंग, आय.टी. इत्यादी विशयामध्ये स्पेशलायझेशन करता येते. साधारणपणे ६० हजार ते १० लाख इतकी प्रतिवर्षी फी असते. एम. बी. ए. झाल्यानंतर चांगली नोकरी मिळू शकते. या कोर्समध्ये व्यवस्थापनाचे ज्ञान चांगले मिळत असल्यामुळे मॅनेजर, प्रशासकीय विभागप्रमुख, सुपरवायझर, इत्यादी प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात.

## एल. एल. बी.

कायद्याची आवड असणाऱ्यांना व वकिली पेशा करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एल.एल.बी हा कोर्स उपयुक्त आहे. हा कोर्स तीन वर्षांचा असून पहिली दोन वर्षे पूर्ण केल्यांनतर जनरल एल. एल. बी. ही पदवी मिळते तर तिसरे वर्ष पूर्ण केल्यानंतर कोर्टामध्ये वकिली करता येते.

## एम. एस. डब्ल्यू.

एम. एस.डब्ल्यू हा दोन वर्षांचा कोर्स असून कोणत्याही शाखेचा पदवीधर यासाठी प्रवेश घेऊ शकतो. या कोर्ससाठी सामूहिक प्रवेश परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड केली जाते. हा कोर्स मराठी व इंग्रजी माध्यमामध्ये उपलब्ध आहे. ज्या उमेदवारांना समाजसेवेची आवड आहे ज्यांना एन. जी. ओ. स्थापन करावयाची आहे ज्या विद्यार्थ्यांना वेल्फेअर ऑफिसर व्हावयाचे आहे, ज्यांना बचत गटासारख्या संस्थांचे समन्वयक म्हणून काम करावयाचे आहे, त्यांच्यासाठी हा कोर्स चांगला आहे.

मटा एज्युकेशन

## सी. ए.

वाणिज्य शाखेतील एक महत्त्वाचा ।कोर्स म्हणून सी. ए. या कोर्सकडे पाहिले जाते. हा कोर्स तीन वर्षांचा असून साधारणपणे हा कोर्स पूर्ण होण्यासाठी चार ते आठ वर्षे लागतात. हा कोर्स इंग्रजी व हिंदी मध्ये उपलब्ध असून या कोर्ससाठी राष्ट्रीय व आंतरष्ट्रीय मान्यता आहे. या अभ्यासक्रमासाठी साधारणपणे २४ विषय अभ्यासावे लागतात. या कोर्ससाठी कोणत्याही शाखेतील विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. तसेच हा कोर्स १२ वी नंतर किंवा पदवीनंतर करता येतो. या कोर्ससाठी आर्टिकलशीप बंधनकारक असुन एखाद्या मान्यताप्राप्त सी. ए. फर्ममध्ये कोर्स पूर्ण करत असताना काम करावे लागते. ज्या विद्यार्थ्यांना अकाउंटन्सी व टॅक्सेशनची आवड आहे व जे या विशयावर प्रभुत्व मिळवू शकतात अशा विद्यार्थ्यांसाठी सी. ए. हा कोर्स खूपच चांगला आहे. सी. ए. झालेनंतर स्टॅट्युटरी हिशोब तपासणीस, अंतर्गत हिशेब तपासणीस, व्यवस्थापकीय अंकेक्षण, सल्लागार, व्यवस्थापकीय तज्ज्ञ, व्यवस्थापक, सी.ई.ओ., इत्यादी प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात.

## आय. सी. डब्ल्यू. ए.

ज्या विद्यार्थ्यांना कॉस्टिंगची आवड आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी हा कोर्स संयुक्तिक ठरतो. या कोर्समध्ये कॉस्टिंग वर अधिक भर असून ज्या विद्यार्थ्याला कॉस्टिंगमध्ये आवड आहे अशांनी हा कोर्स निवडावा. आय. सी. डब्ल्यू. ए. हा कोर्स साधारणपणे तीन-सहा वर्षांमध्ये पूर्ण होतो. या कोर्ससाठी फारसा खर्च येत नसून या कोर्ससाठी मार्गदर्शन व परीक्षा कोल्हापूर येथे उपलब्ध आहे. या कोर्ससाठी कोणत्याही शाखेतून बारावी किंवा पदवी झालेल्या विद्यार्थ्याला प्रवेश घेता येतो. या कोर्समध्ये कॉस्टिंग, प्रोजेक्ट रिपोर्ट, व्यवस्थापन, गणित, अर्थशास्त्र, संख्याशास्त्र हे विषय अभ्यासावे लागतात. हा कोर्स पूर्ण झालेनंतर राष्ट्रीय व आंतरष्ट्रीय पातळीवर करिअर करता येते.

## सी. एस.

संस्थांची नोंदणी करणे घटनापत्रक व नियमावली तयार करणे. कंपनीच्या सभांचे आयोजन करणे, मिटिंगची विषय पत्रिका तयार करणे व कागदपत्रची पूर्तता करणे इत्यादी प्रकारच्या सेवा व नोकरीसाठी सी. एस. हे शिक्षण उपयुक्त आहे. सी. एस. हा कोर्स इंग्रजी व हिंदी मधून करत येते. साधारणपणे हा कोर्स पुर्ण करण्यासाठी तीन ते चार वर्षे लागतात. हा कोर्स पुर्ण केल्यानंतर विविध क्षेत्रातील मोठमोठ्या कंपन्यामध्ये संधी आहेत. नोकरी बरोबरच या कोर्सनंतर स्वतःचे कन्सल्टिंग सेंटर सुरू करता येते. छोट्या उद्योग समुहाला पूर्णवेळ व्यवस्थापक नेमणे शक्य होत नसल्यामुळे अशा छोट्या कंपन्यांना सल्ला देण्याचे काम सी. एस. झालेनंतर मोठ्या प्रमाणात मिळू शकतो.

## सी. एफ. ए.

सी. एफ. ए. हा कोर्स फायनान्सवर अधिक फोकस केलेला आहे. हा कोर्स तीन वर्षांचा असून जवळ जवळ १० पेपर्स द्यावे लागतात. हा कोर्स सेमिस्टर पद्धतीने राबविला जातो. हा कोर्स पूर्ण केल्यानंतर चांगला जॉब मिळू शकतो. बँका, वित्तीय संस्था, शेअर मार्केट, आर्थिक सल्ला केंद्र या ठिकाणी नोकरी मिळू शकते. हा कोर्स पूर्ण झाल्यानंतर आर्थिक सल्लागार म्हणून चांगल्या प्रकारे काम करता येते.

## इतर कोर्सेस व करिअर

एम. सी. ए., पी.जी. डी. सी. ए., डी. बी. एम., डी. आय. टी., डी. एल. एम., जी. डी. सी. अॅन्ड ए., हॉटेल मॅनेजमेंट, डी. सी. ए., डी. बी. एम., इंटेरिअर डिझाईन, विविध विषयातील पी. जी. डिप्लोमाज, मास्टर ऑफ रिटेल मॅनेजमेंट, मास्टर ऑफ एव्हिएशन, मास्टर ऑफ हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन मास्टर ऑफ मेडिया बिझनेस मॅनेजमेंट इ. एक वर्षाचे कोर्सेस करुन चांगल्या प्रकारे करिअर करता येते.

2 3 MAY 2019

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. परीक्षा सुरळीत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील एम.फिल., पीएच. डी. (स्पेशल अँड मिशन ड्राईव्ह) प्रवेश परीक्षा तीन सत्रात सुरळीत पार पडली.

या परीक्षेसाठी ३४५ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी २८४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ६१ विद्यार्थी गैरहजर होते. एम. ई., एम. टेक., इतिहास, रसायनशास्त्र, मायक्रोबायोलॉजी, हिंदी, इंग्रजी, भुगोल, जर्नालिझम, कॉम्प्युटर सायन्स अँन्ड इंजिनिअरिंग विषयांसाठी ही परीक्षा झाली.